वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय
राज्य कामगार विमा सोसायटी
(महाराष्ट्र शासन)
आर.एच–३३ गोरख वाघ चौक, मनाली स्क्वेअर, पहिला मजला, बजाज नगर,
वाळूज, छ.संभाजीनगर .४३११३६

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**OFFICE OF THE ADMINISTRATIVE MEDICAL OFFICER,**
**EMPLOYEES STATE INSURANCE SOCIETY**
**(Government Of Maharashtra)**
**RH-33, , Gorakh Wagh Chowk, Manali Square, First Floor, Bajaj Nagar,**
**Waluj, Chh. Sambhajinagar-431136**
**E-mail : aurangabad.amo@gmail.com** **Phone No.** 0240-2554490

**Outward.No.AMO/MH.E.S.I.Society/ Chh. Sambhajinagar / disp dc.4 Mukunwadi, Ranjangov( Gangapur) /** 3852 **/2025 Date-**
24 SEP 2025

**TO,**
The Joint Director ,
S.R.O. ESIC,
Chh.Sambhajinagar.

**Sub** :- Uploading the tender for "Accommodation for MH-ESIS dispensaries in Chh. Sambhajinagar Region" on ESIC web site esic.nic.in/tenders .

**Sir,**

As your are aware that ESIS is in process of establishing Dispensaries in nearby Implemented varies in Maharashtra this office wants to upload the tender for procument of Accommodation for Dispensaries in Chh. Sambhajinagar district.

Kindly find enclosed the tender document. The tender to open from **26.092025 to 07.10.2025** till **5.00 pm**.

You are requested to instruct concerned to upload the tender document on website.

Yours sincerely,

**( Dr. A.S.Ingle )**
**A.M.O Office chh.Sambhajinagar**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय

राज्य कामगार विमा सोसायटी

(महाराष्ट्र शासन)

आर.एच—३३ गोरख वाघ चौक, मनाली स्क्वेअर, पहिला मजला, बजाज नगर, वाळूज, छ.संभाजीनगर .४३११३६

**OFFICE OF THE ADMINISTRATIVE MEDICAL OFFICER,**

**EMPLOYEES STATE INSURANCE SOCIETY**

**(Government Of Maharashtra)**

**RH-33, , Gorakh Wagh Chowk, Manali Square, First Floor, Bajaj Nagar, Waluj, Chh. Sambhajinagar-431136**

**E-mail: aurangabad.amo@gmail.com Phone No. 02402992605**

## वैप्रअ कार्यालय राकावि सोसायटी, छ. संभाजीनगर अंतर्गत येणा-या सेवा दवाखान्यांसाठी इमारती/जागेसाठीची मागणी निविदा .

सक्षम प्राधिकारी, वैद्यकीय प्रशासनअधिकारी, **राकावि सोसायटी कार्यालय छ. संभाजीनगर** येथे सेवा दवाखान्यासाठी योग्य जागा भाडेतत्वावर घेण्यासाठी **इच्छापत्र** (Expression of Interest – EOI) आमंत्रित करीत आहोत खाली नमूद केल्याप्रमाणे आवश्यक बांधकाम क्षेत्र (पार्किंग, लिफ्ट, कॉरिडॉर, सामाईक जागा, बाल्कनी, लॉबी इत्यादी वगळून). ठिकाण व आवश्यक क्षेत्रफळ यासंबंधी तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सेवा दवाखान्यासाठी जागा / ठिकाण | क्षेत्रफळ (चौ.फु) |
|---|---|---|
| १ | मुकुंदवाडी व चिकलठाणा, छ. संभाजीनगर | १६०० (चौ.फु) |
| २ | रांजणगाव (गंगापुर) छ. संभाजीनगर | ४३०० (चौ.फु) |

**तळमजल्यावर** (Ground Floor) वरिल जागेस प्राधान्य देण्यात येईल, अर्ज **निर्धारित नमुन्यात** (Prescribed Proforma) सादर करावा.

**ई-ओ-आय चे वेळापत्रक** (Schedule of EOI):-

इच्छुक मालकांनी/ निविदादारांनी निर्धारित नमुना अर्ज पूर्ण भरून व स्वाक्षरी करून दोन स्वतंत्र लिफाफ्यात सादर करावा.

१. एक लिफाफा **"तांत्रिक निविदा (Technical Bid)"** साठी दि. ०८/१०/२०२५
२. दुसरा लिफाफा **"आर्थिक निविदा (Financial Bid)"** साठी दि. १०/१०/२०२५

दोन्ही लिफाफे एका मोठ्या सीलबंद लिफाफ्यात ठेवावेत व त्यामध्ये आवश्यक कागदपत्रांच्या **स्वतः प्रमाणित** (self-attested) **झेरॉक्स प्रती** जोडाव्यात.

मोठ्या लिफाफ्यावर स्पष्टपणे खालील शब्द लिहावेत –

वै.प्र.अ.सेवा दवाखान्यासाठी **जागा भाडेतत्वावर घेण्याबाबतची मागणी – [शहराचे नाव]"**

सदर पाकिटे पोस्टाने किंवा प्रत्यक्षरित्या खालील पत्त्यावर **दिनांक ०७/१०/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** पोहोचणे आवश्यक आहे.

**कार्यालय – वैद्यकीय प्रशासन अधिकारी**
महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायट,
आर.एच.-33, गोरख वाघ चौक, मनाली स्क्वेअर, पहिला मजला,
बाजाज नगर, वाळूज, छ. संभाजीनगर – 431136
ई-मेल : aurangabad.amo@gmail.com

**सूचना :**

नियत दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा **कुठल्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. तांत्रिक निविदा** (Technical Bids) दिनांक **०८/१०/२०२५ रोजी दुपारी 12 .०० वाजता** उघडण्यात येतील. इच्छुक जागा-मालक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याच्या वेळी उपस्थित राहू शकतात.

**टिप-प्रशाकिय किंवा तांत्रीक कारणास्तव तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होवु शकतो.**

**सामान्य अटी व शर्ती :-**

१. इमारत/जमीन ही वादग्रस्त नसावी व कायदेशीर रीत्या कागदोपत्री अडथळ्यापासून मुक्त असावी तसेच स्पष्ट हक्कपत्र (Clear Title) असावे. इच्छुक मालकाने याची लेखी स्वरुपात हमी द्यावी.

२. तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडल्यानंतर, नियुक्त समितीकडून जागेची प्रत्यक्ष पाहणी (Physical Inspection) करण्यात येईल, जेणेकरून दिलेली ऑफर AMO MH-ESIS च्या आवश्यकतेनुसार पुर्तता करता येते की नाही हे तपासण्यात येईल. फक्त तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या अर्जदारांचा आर्थिक निविदा (Financial Bid) साठी विचार करण्यात येईल.

३. सदर इमारतीत पर्याप्त पार्किंग सुविधा उपलब्ध असावी.

४. इमारती पासून ऑटो/टेम्पो/बस थांब्याच्या जवळपास असावी.

५. इमारतीच्या जागेत किमान दोन शौचालये (Toilets) व वॉशबेसिनची सुविधा असावी. व कार्यालयांच्या आवश्यकते नुसार बदल करून देण्यात यावेत

६. मालमत्तेमध्ये २४ तास वीजपुरवठा उपलब्ध असावा सेवा दवाखान्यासाठी स्वतंत्र वीजमीटर बसविणे आवश्यक आहे व योग्य लोडसाठी योग्य अर्थिंग असावी. वीज जनरेटर बॅकअप सुविधा उपलब्ध असल्यास त्यास अधिक प्राधान्य दिले जाईल.

७. जागेच्या मालकाने सेवा दवाखान्यासाठी उपग्रह डिशेस/संचार टॉवर्स/डेटा केबल्स इत्यादी बसविण्याची तसेच वीज निर्मिती/वाढीसाठी आवश्यक उपकरणे (जसे पॉवर ट्रान्सफॉर्मर्स, जनरेटर्स इ.) बसविण्याची परवानगी कोणत्याही आक्षेपाशिवाय व अतिरिक्त शुल्काशिवाय द्यावी. तसेच सेवा दवाखान्याच्या कामकाजासाठी लागणारे फलक, जाहिरात साहित्य, ए.सी. इत्यादी लावण्यास इमारतमालकाने कोणत्याही प्रकारचा आक्षेप मान्य केला जाणार नाही याबाबत कोणतीही नुकसान भरपाई/अतिरिक्त भाडे अनुज्ञेय होणार नाही.

८. सदर इमारतीत २४ तास पाणीपुरवठा उपलब्ध असावा.

९. भेट देणाऱ्या रुग्णांसाठी/लोकांसाठी पुरेशी प्रतीक्षा कक्ष (Waiting Area) असावा.

१०. सेवा दवाखाना सुरू करण्यासाठी अंतर्गत काही बदल (Internal Modification) आवश्यक असल्यास, ते इमारत मालकाने स्वतःच्या खर्चाने करून देणे आवश्यक आहे.

११. दिलेली जागा सर्व केंद्रीय/राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आवश्यक बांधकाम परवानग्या/मान्यता घेतलेली असावी व कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर अडथळ्यापासून (Encumbrances) मुक्त असावी.

१२. छत्रपती संभाजीनगर AMO द्वारा आवश्यकतेनुसार मालक/भाडेकरूने तीन वर्षाच्या कालावधीत किंवा संपत्ती हाती देण्यापूर्वी सर्व दरवाजे, खिडक्या, वेंटिलेटर्स, ग्रील्स इत्यादींचे पेंटिंग किंवा पॉलिशिंग करणे अपेक्षित आहे. जर मालक/भाडेकरू असे न केल्यास, AMO, छत्रपती संभाजीनगर याना हक्क असेल की ते मालक/भाडेकरूच्या खर्चातून पेंटिंग किंवा पॉलिशिंग करण्यासाठी झालेला खर्च इमारत भाड्यातून वजा केली जाईल किंवा अन्यथा मालक/भाडेकरू कडून वसूल केला जाईल.

१३. इमारत मालक /भाडेकरूने AMO MH-ESIS च्या आवश्यकतेनुसार अल्युमिनियम partitions, कॅबिन्स, चेंबर्स, स्टेशनरी/रेकॉर्ड रूम, विश्रांती कक्ष, शौचालये इत्यादींची बांधकामे त्याच्या स्वतःच्या खर्चाने AMO MH-ESIS ला संपत्ती हस्तांतरीत करण्यापूर्वी करणे आवश्यक आहे.

१४. मासिक भाडे (सर्व कर वगळून) वित्तीय निविदामध्ये नमुद करावे , अन्यथा निविदा नाकारली जाऊ शकते.

१५. प्रस्तावित जागा सुस्थितीत असावी आणि संपत्तीचे मालक/भाडेकरू हे AMO कडून प्रस्ताव स्वीकारण्याच्या 30 दिवसांच्या आत करारनामा करून संपत्ती हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.

१६. वीज व पाणी शुल्क AMO MH-ESIS कडून दिले जातील.

१७. संपत्ती/भूमीवरील सर्व कायदेशीर कर्जे, ज्यामध्ये प्रॉपर्टी कर समाविष्ट आहे, ती मालकाने ठरल्या प्रमाणे भरावी.

१८. इमारतभाडे देयकाची मागणि विहितनमुन्यात सादर करावी व ती महिन्याच्या शेवटी अदा केली जातील आणि करांची (TDS आणि GST) कपात करण्यात येईल.

१९. AMO MH-ESIS कडून मालकाला कोणतेही अग्रिम भाडे देण्यात येणार नाही.

२०. इमारत मालकाने AMO MH-ESIS सोबत एक मान्यताप्राप्त आणि वैध भाडेकरार करावा. भाडेकराराची नोंदणी शुल्क मालकाने भरावे लागेल व कराराची मूळ प्रत भाडेकरार करणाऱ्याच्या ताब्यात राहील.

२१. AMO MH-ESIS च्या कार्यालयीन आवश्यकते नुसार भाडेकराराच्या कालावधीत/वाढवलेल्या कालावधीत भाडेकरारधारक काही अस्थायी बदल, जसे की partitions, कार्यालयीन साधने आणि फिटिंग्स, करु शकतात.

( कृ.मा.प )

२२. भाडेकराराच्या कालावधीत, मालक/भाडेकरू AMO MH-ESIS च्या हक्काच्या अतिक्रमणामुळे किंवा कोणत्याही भाडेकराराच्या अटी बदलल्याशिवाय संपत्तीचे हस्तांतरण, तारण, विक्री किंवा अन्य कोणत्याही पार्टीला अधिकार देऊ शकत नाही. हे सर्व AMO MH-ESIS कडून लेखी परवानगी मिळवल्यानंतरच करता येईल.

२३. योग्य प्राधिकृत अधिकारी, AMO, MH-ESIS छत्रपती संभाजीनगर यांच्या कडे अधिकार असतील की ते कोणत्याही अर्जाला स्वीकारू किंवा नाकारू शकतात किंवा या प्रक्रियेला कोणत्याही टप्प्यावर रद्द करू शकतात, त्यासाठी कोणतेही कारण न देता आणि त्यांना आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार आहे. EOI प्रक्रियेत भाग घेतल्याने AMO ऑफिसकडून कोणतीही बांधिलकी निर्माण होत नाही. AMO MH-ESIS कोणत्याही अर्जदारांना EOI प्रक्रियेदरम्यान किंवा करार स्वाक्षरी करण्याच्या आधी कोणत्याही नुकसानी/हानीसाठी जबाबदार राहणार नाही.

**वैद्यकीय प्रशासन अधिकारी,**
**महा. रा.का.वि. सोसायटी**
**वाळुज,छत्रपती संभाजीनगर**

प्रति,
वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर.

## परिशिष्ट -१
## (तांत्रिक निविदा)
## सेवा दवाखान्या साठी जागेची किंमत

| अनुक्रमांक | तपशील | |
|---|---|---|
| १ | **मालकाची माहिती- मालमत्तेचा हक्कधारक/मालकाचे नाव:** | |
| २ | कायमखर्च खात्याचा क्रमांक (PAN): | |
| ३ | **मालकाचे संपर्क तपशील:** | |
| ४ | **दूरध्वनी/मोबाईल क्रमांक:** | |
| ५ | ई-मेल आयडी: | |
| ६ | **मालकाचा संपूर्ण टपाल पत्ता:** | |
| ७ | २. प्रस्तावित मालमत्तेची माहिती | |
| ८ | (अ) मालमत्तेचे स्थान व संपूर्ण पत्ता: | |
| ९ | **(ब) स्थानिक प्राधिकरणामार्फत मान्यता प्राप्त मालमत्तेचा वापर:**<br>(लागू पडणारा पर्याय निवडा) | निवासी<br>☐ व्यावसायिक<br>☐ मिश्र वापर<br>☐ संस्थात्मक<br>☐ इतर (स्पष्ट करा): ____________ |
| १० | (क) इमारतीतील एकूण मजल्यांची संख्या: | |
| ११ | ३. DISPENCERY MH-ESIS साठी पार्किंगची **व्यवस्था**<br>**(अ) उघड्या पार्किंगसाठी उपलब्ध क्षेत्र (चौरस फूट/मीटर):**<br><br>**(ब) बंद/भुयारी पार्किंगसाठी उपलब्ध क्षेत्र (चौरस फूट/मीटर):**<br><br>**(क) Dispensary MH-ESIS साठी आरक्षित केलेले पार्किंग क्षेत्र (असल्यास):** | |
| १२ | **(अ) जवळच्या बस स्थानकापासून अंदाजे अंतर:**<br><br>**(ब) जवळच्या रेल्वे स्थानकापासून अंदाजे अंतर:** | |
| १३ | मालमत्ता हक्क व कायदेशीर स्थिती<br>मालमत्ता सर्व प्रकारच्या अडचणी, दावे व न्यायालयीन प्रकरणांपासून मुक्त आहे का? | होय/नाही |
| १४ | (ब) सर्व शासकीय शुल्के (मालमत्ता कर, वीज बिल, पाणी बिल इ.) वेळेत भरलेली आहेत का? | होय/नाही |
| १५ | मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी तयार आहे का?<br>अधिकृत अधिकारीकडून ताबा प्रमाणपत्र/पूर्णत्व प्रमाणपत्र मिळाले आहे का? | होय/नाही |
| १६ | **सुविधा व उपयुक्तता**<br>**(अ) शौचालयाची व्यवस्था:**<br>• **सामायिक शौचालये:** होय ☐ / नाही ☐ – संख्या: ______<br>• **संलग्न शौचालये:** होय ☐ / नाही ☐ – संख्या: ______ | होय/नाही |
| १७ | स्वतंत्र वीज पुरवठा उपलब्ध आहे का? | होय/नाही |
| १८ | मंजूर भार (KVA मध्ये): | होय/नाही |
| | वीज बॅकअप/जनरेटरची सुविधा उपलब्ध आहे का? | होय/नाही |

(कृ. मा. प.)

| | | |
|---|---|---|
| १९ | **टॉवर**/डिश **बसवण्यास** अनुमती (NOC)<br>**(अ) टेरेस/छतावर उपग्रह डिश किंवा टॉवर बसवण्यासाठी परवानगी/NOC आहे का?**<br>(राज्य शासनाच्या नियमांनुसार कोणतेही अतिरिक्त भाडे न आकारता MH-ESIS ला डिश/टॉवर बसवण्याची व आवश्यकतेनुसार काढून टाकण्याची परवानगी असावी. सर्व खर्च ESIS द्वारे केला जाईल.) | होय/नाही |
| २० | लोगो **व** जाहिरात **लावण्याचा हक्क**<br>**Dispensary** MH-ESIS ला त्यांच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर व आतील भागात चिन्ह**(लोगो) व जाहिराती** लावण्याचा अधिकार असावा. | होय/नाही |

ठिकाण-

**स्वाक्षरी (मालक/अधिकृत व्यक्तीची)**

दिनांक-

**नाव:**

**कागदपत्रे: अर्जासोबत खालील कागदपत्रांची स्व-स्वाक्षरी केलेली प्रत सादर करावी:**

१. **सादर केलेल्या इमारतीचा 7/12 किंवा 8A उतारा / सूची II.**
२. **पत्त्याचा पुरावा, उदा. वीज बिल किंवा मालमत्ता कर दस्तऐवज.**
३. **PAN कार्ड (प्रत).**
४. **GST नोंदणी प्रमाणपत्र, लागू असल्यास.**

प्रति,
वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर.

## परिशिष्ट-II(आर्थिक निविदा)
## सेवा दवाखान्यासाठी जागेची/ इमारतीची किंमत

| अनुक्रमांक | वर्णन | | |
|---|---|---|---|
| १ | मालमत्तेचा हक्क असलेल्या व्यक्ती/पक्षाचे नाव (यापुढे "मालक" म्हणून संबोधले जाईल) | | |
| २ | कायमस्वरूपी खाते क्रमांक (PAN) | | |
| ३ | सादर केलेल्या इमारतीचा संपर्क तपशील | | |
| ४ | GST नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ५ | संपूर्ण पोस्टल पत्ता | | |
| ६ | दूरध्वनी / मोबाइल क्रमांक | | |
| ७ | ईमेल आयडी | | |
| ८ | सादर केलेल्या मालमत्तेची माहिती | | |
| ९ | मालमत्तेचे ठिकाण व पत्ता | | |
| १० | एकूण क्षेत्रफळ (चौरस मीटर) | | |
| | मासिक भाडे | मासिक भाडे आकडेवारीत (रु.) | मासिक भाडे शब्दात (रु.) |

(भाडे GST वगळता नमूद करावे)

| | |
|---|---|
| स्थान : | मालक किंवा अधिकृत सहीदाराचे स्वाक्षरी |
| दिनांक : | नाव : |

टीप :

अ) तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदादार सर्वात कमी दर (L१) सादर केलेल्या भाड्याच्या आधारावर ठरविली जाईल.

ब) मालकांना सर्व स्तंभ नीट भरावे असे सुचवले आहे.

क) टेंडर फॉर्ममधील सर्व नोंदी स्पष्ट व वाचनीय असाव्यात. अनिवार्य असल्यास केलेली काट-छाट/ओव्हररायटिंग अधिकृत सहीदाराने प्रमाणित करावे. टेंडर फॉर्ममध्ये आकड्यांमध्ये व शब्दांमध्ये केलेल्या काटछाट किंवा ओव्हररायटिंगमुळे शब्दात नमूद केलेली नोंद/भाडे विचारात घेतली जाईल. टेंडर फॉर्ममध्ये व्हाईटनरचा वापर असू नये.